OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

# मराठवाड्याच्या लोकधारणा प्रवाही करणारी महानोरांची कविता

प्रा. रिंगणे रमेश बाबासाहेब
मराठी विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर , गढी .
ता. गेवराई जि. बीड
संपर्क - ९८२३७२०३७४

प्रा. डॉ. सरकटे सदाशिव हरिभाऊ
मराठी विभागप्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर , गढी .
ता. गेवराई जि. बीड
संपर्क - ९४२००२९११५

**सारांश :**

मराठवाड्याच्या राना, मातीतून उतरलेला हाच साधेपणा, सहजता माणसा-माणसांत भिनली आहे. इथं जे जे काही सकारात्मक घडलेले आहे, त्याच्या मुळाशी समृद्ध असणारी लोकपरंपरा हीच होती. जी जी वैचारिक आवर्तने मराठवाड्याने दिली, ती स्थिरावली आणि विस्तारली देखील. म्हणून मराठी कवितेच्या क्षेत्रातील मराठवाड्याचे आद्यत्व नाकारता येत नाही. लोकधारणा आणि लोकजीवनाला समांतर असण्याची ही परंपरा महानोरांचा काव्य श्वास आहे. आणि याच भूमिकेतून प्राचीन भक्ती आणि शक्ती च्या जोरावर लोकतत्वाला महानोरांनी काव्यरूपाने फुलविले आणि प्रवाही सुध्दा केले.

**गोषवारा :**

मराठवाड्याची संस्कृतिक परंपरा तशी लाखमोलाची आहे. महाराष्ट्राला अनेक पातळ्यांवर विचारांची, ज्ञानाची, मनोभू... बहुतांशी याच मराठवाड्याने पूरविली आहे. कसदार माती आणि माणसांचा जोमदारपणा याच पार्श्वभूमीवर सगळ्यांची उभारणी झाली आहे. ऐतिहासिक सामाजिक राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात मराठवाडा कायमच अग्रेसर आहे. साहित्यिक पातळीवरदेखील मराठवाड्याच्या शब्द सह्याद्रीने अभिव्यक्तीचा बराचसा भाग बोलकादेखील केलेला आहे. मराठी कवितेची तर पायाभरणीच या मराठवाड्यात झालेली आहे. याच पार्श्वभूमीवर मराठी कवितेला साधेपणाचा साज चढवून भाव भावनेला लयबद्ध लयीत आणि लोकसाहित्याच्या समृद्ध धर्तीवर अभिव्यक्त केले, ते ना. धों. महानोर यांनीच.

**बीजशब्द :**

लोकतत्व, लोकसाहित्य, मराठवाडा, रान, ग्रामीण, लोकसंस्कृती, ओवी, मौखिकता, निसर्ग, लोकभाषा, इत्यादी.

Scanned with CamScanner

**प्रस्तावना :**

संत महतांची भूमी
माझ्या मराठवाड्याची,
भोळी भाबडी माणसं
लई पुण्यवान माती ।

कवी भगवान देशमुख यांनी वर्णिलेली ही गुण, वैशिष्ट्ये मराठवाड्याला अगदीच ठसाठसीत करणारी आहेत. 'जसा आहे तसा दिसतो, अन् दिसतो तसा वर्ततो' याउक्तीतला हा साधेपणा, भाबडेपणा मराठवाड्याची वेगळी ओळख रेखाटतो. ज्ञानेश्वर-चक्रधरांच्या दृष्टिकोनातून प्रेरित आणि प्रवर्धित झालेला हा मराठवाडा आहे. भक्तीमार्गाने सबंध समाजाला डोळस दृष्टी दिली ती, या मराठवाड्याने. एकेकाळच्या समृद्ध भारताच्या इतिहासाचा साक्षीदार राहिला आहे हा मराठवाडा. याच मराठवाड्याने ग्रामीण, दलित या मराठी साहित्याच्या नव्या संवेदनांना मुखर करून जागतिक स्तरावर पोहचवले. अनेक लोकचळवळी, लोकलढे, ह्या मराठवाड्याने उभा केले आहेत. मराठी भाषेचा तर महानुभाव आणि संतांनी अभिनिवेशाने बोलून, लिहून भाषाभिमान जागृत केला तोही इथेच. लोकसंचित आणि लोकसाहित्याने तर मराठवाड्याची सांस्कृतिक जडणघडणच केलेली आहे. म्हणूनच या सर्व पार्श्वभूमीवर ना. धों. महानोरांची कविता ठळकपणे नजरेसमोर येते.

**ना. धों. महानोर यांच्या कवितेतून प्रवाही होणाऱ्या लोकधारणा :**

लोकतत्वाचा हाच समांतर धागा कायमच महानोरांच्या कवितेतून प्रवाही झाला आहे. याच संवेदनशीलतेच्या जोरावर साहित्यविश्वात, राजकारणात, समाजकारणात, कृषीक्षेत्रात आपला वेगळा ठसा, प्रतिभावंत कवी म्हणून महानोरांनी उमटवला. यात सर्वात मोठा वाटा इथल्या ग्रामीण जीवनाचा आहे, समृद्ध अनुभवांचा आहे. या भावनिक वलयाशी ते इतके एकरूप झालेले आहेत की 'रान' कवी म्हणूनही त्यांचा मराठी साहित्यात आदराने उल्लेख केल्या जातो.

ना धो महानोर यांना त्यांच्या काव्य प्रवासाविषयी नेहमी विचारले जाते. तेव्हा ते सांगतात की, "त्या काळी खेडं हे भजन, कीर्तन, भारुड, प्रवचन, नामस्मरण, सण-उत्सव, पालखी-उत्सव अशा अनेक चांगल्या मौखिक साहित्याने समृद्ध असं होतं. तमाशा, लोककला, लोकनृत्य, पोवाडा व अनेक लोककलांनी खेडी, जत्रा छान व्यापलेल्या होत्या. रात्र-रात्र हे उत्सव चालायचे. सूर्योदयाला जात्यावरील प्रसन्न ओवी, संसाराचं सुख दुःख गाणारी जात्याची घरघर, लय, हलकं संगीत आणि अस्सल भाव असलेली कविता म्हणजे ओवी, झोपाळ्यावरली झिम्मा फुगडीची गाणी, गोष्टी हे सगळं लोकसंस्कृतीचे लेणं थेट लहानपणापासून मी ऐकलं. त्यात मीही सहभागी असायचो. या सगळ्या संस्कृती जगताचं उत्तम गीत संगीत आणि शब्दकळा माझ्यावर संस्कार करून होती. लिखित साहित्याच्या आधी हे मौखिक समृद्ध साहित्य, कला माझ्या मनात बीज रोवून होती."१ असा हा गावातला चैतन्यदायी संस्कार

Scanned with CamScanner

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

त्यांच्यावर झाला असल्यामुळेच, त्यांच्या कवितांना लोकतत्वाची लय आली. आणि ग्राच जगण्यातून वास्तवाचा बाज देखील प्राप्त झाला. एकीकडे हे सारं मौखिक परंपरेचे समृद्ध जगणं आणि दुसरीकडे राणा मातीशी चाललेला कामाचा कष्टाचा संघर्ष या दोन टोकावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला हळुवारपणाचा पैलू पाडला. म्हणून तर पाखरांसारखा हिरवळीतून बाग-बगीच्यातून सौंदर्य चित्रीत करणारा मराठीतला निसर्ग, शेती आणि शेतीशी निगडित प्रतिमांमध्ये येथेच मनसोक्त बहरला तो ना. धों. महानोर यांच्या कवितेतच.

"गुंतलेले प्राण या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदून आनंदूनी बेहोष होता
शब्दगंधे तू मला बाहूत घ्यावे"
रानातल्या कविता

रानाशी जोडली गेलेली घट्ट नाळ आणि या भावबंधाच्या अभिव्यक्तीचे आनंदरूपी शब्दांना केलेले अवाहन हीच कवीची काव्य भूमिका असल्याचे दिसते. आणि

"या शेताने लळा लाविला असा की
सुखदुःख ला परस्पराशी हसलो रडलो
आता तर हा जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो."    रानातल्या कविता

ना. धों. महानोर यांच्या कवितेचे केंद्र असे रानाभोवती फिरते आहे. म्हणून त्यांचे अनुबंध सहज आणि तरल होत जातात, तशी त्यांची कविताही.

ग्रामीण जीवन हेच एकमेव आतापर्यंत तरी विज्ञानाचे, संवेदनेचे स्वयंपूर्ण केंद्र आहे असे अनेकांचे मत आहे. बालकवी, बहिणाबाई, ना. घ. देशपांडे आणि ना. धों. महानोर यांचे देखील व्यक्तिमत्त्व घडले, बहरले ते या सांस्कृतिक ग्रामवास्तवातच. ह्याच लोकसंस्कृतिक ठेव्यामधून ना. धों. महानोर यांनी हि लोकलय, लोकरूढ, लोक संस्कार जपला आणि शब्दांच्या माध्यमातून विस्तारला देखील.

महानोरांवर एकूणच या लोकसंस्कृतिक स्वत्वाचा लहानपणापासून संस्कार झालेला आहे. त्यांचे वाचन मनन चिंतन आणि संवेदनतत्व याच लोकतत्वाने प्रगल्भ केले आहे. आईने गायलेल्या जात्यावरील ओव्या, त्यांनी एकत्र करून संपादित केलेली विविध गाणी. ओवी, अभंग, लावणी, लोकगीत, कीर्तन यांचा त्यांच्या कवितेवरील प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. नागनाथ कोतापल्ले म्हण 'महानोरांची कविता ही गाथा, लावणी आणि लोकवाड्मयाचे संस्कार पचवून समृद्ध होत गेली आहे'. म्हणूनच जनमानसाची पकड पटकन घेताना दिसते ती महानोरांची कविता. परंपरेने चालत आलेला हा लोकसंस्कृतिक ठेवा मात्र गतिमान आहे, हे लक्षात घेण्याजोगे आहे. कारण तो लोकांशी निगडित

Scanned with CamScanner

असणारा प्रत्यक्ष व्वहार आहे. आणि हाच लोकतत्वाचा धागा ना. धों. महानोरांनी अलगद पकडून ठेवलेला आहे. त्यांच्या अनेक कविता चित्रपटात गीत म्हणून रसिकप्रिय आणि श्रवणीय झाल्या आहेत.

"प्रादेशिक शब्दांचा आणि त्या प्रदेशातील प्रचलित असलेल्या गीतातील लयीचा उपयोग करूनही महानोरांची कविता ग्रामीण होत नाही. ग्रामीण कवितेच्या सर्व संकटांना फाटा देऊनही महानोरांची कविता गावरान राहते."२ अशी त्यांची बोली सुद्धा ग्रामीण असून लोकभाषेशी साधर्म्य साधणारी आहे. लोकसाहित्याचा बाज बोली आहे आणि याच बोलीच्या जीवावर ती लोक तत्वाचा शोध घेते व तिची पुनर्मांडणी करताना दिसते. म्हणून अस्सलतेचा हा लोक संस्कृतिक गुणधर्म महानोरांचे बलस्थान आहे.

"जात्याच्या पाळूचा कंठ झाला बाई जड
राजा विना देश समद असुनी उजाड ।
घरघरतया जातं घोर घर घर राजाला
राजा विना घास गोड लागनां जीवाला ।
आयुष्याला दुःख दुःख बिलगुन राहिलं
ओल्या पापणीच्या बाई ओटी, पोटी आलं ।
शहाण्या रं राजा तुला उल्टी बुद्धी झाली
बापाला होईना, बाई तिचं नाव दिल्ली"। 3

बहिणाबाईच्या अशाच चिंतनशील जाणिवेतून महानोरही आपल्याला विचार करायला लावतात. ओवी या परंपरागत जीवन गाण्याला ते पुन्हा गातात आणि असे संपन्न करतात. रवींद्र किंबहुने ही महानोरा विषयी बोलताना म्हणतात की 'लोकसाहित्यातील आणि लोकगीताची संपन्न परंपरा महानोरांनी आपल्या कवितेत संपूर्ण ताकदीनिशी योजली' हे आणि असेच मराठवाड्याच्या लोकसंस्कृतिक संचिताला देखील पुनरूजीवित करण्याचे काम महानोरांनी केले.

"सूर्य नारायणा नित्यनिनेमाने उगवा
अंधाराच्या दारी थोडा उजेड पाठवा"
किंवा
"आबादानी हो शेतात भरुदे दाण्याचे
तुझ्या पालखीला शब्द बांधू" । ४

अशीही पळसखेड आणि अजिंठ्याच्या परिसरातील महानोरांची लोकभावना ग्रामीण भागाच्या संपन्नतेला ओवी रूपाने प्रतिबिंबित करणारी आहे. तुकाराम, ज्ञानदेव यांच्या जवळ जाणारी अशी ही कविता आहे, म्हणूनच शेतकरी हित, जन कळवळयाच्या बाबतीत मराठवाडा सत्वाने आणि तत्वानेही बोलका झाला, तो महानोरांच्या शब्दाशब्दातून. माणुसकी आणि मा[illegible]तेला प्रवर्धित

Scanned with CamScanner

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

करणारी मराठवाड्याची ही लोकधारणा आहे जी संताच्या विचार कार्यात होती, तशीच महानोरांच्या कविते दिसून येते.

"कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लगडून जावे" ।
किंवा
"शेत गव्हाचे पिवळे जरा नशेत झूलते
आणि साडीचे उगाच अंग शहारून येते ।
पोटर्यातल्या गव्हाचे हसू ओंब्यात दाटते
केळ कातीव रुपाची, छाया पाण्यात शोधते"।

या ज्या शब्दकळा महानोरांनी लयबद्ध केल्या त्या मराठवाड्याच्या कसदार मातीतून निर्माण झालेल्या आहेत. आणि कृषि अनुभवाच्या ग्रामीण भागातील याच धारणा महानोरांनी कवितेच्या तत्वात आणि लयीत मुरवल्या आहेत. संस्काराच्या, समृद्ध परंपरेच्या, समन्वायाच्या ऐतिहासिकतेतून ज्या काही लोक समजुती, रूढी, आणि वहिवाट तयार झाल्या होत्या. त्यावरील मळभ दूर सारून एकूणच मराठवाड्याच्या आणि महाराष्ट्राच्या लोकधारणा महानोरांच्या कवितेने जिवंत केल्या आहेत. याच लोकवाणीच्या शैलीचे, परंपरेचे अभिव्यक्ती करण विविध पैलूतून ना. धों. महानोर करतात म्हणूनच त्यांची कविता शब्दांच्या जंजाळात अडकून पडत नाही. कृषीसंस्कृतीतून आलेल्या याच स्वच्छंदी वृत्तीला त्यांनी लॉकतत्व, लय आणि धरणांचे बांध घातले.

"पिकातून पाखरांचा धिंगाणा मनमानी
केसरात नाली कोणी महिना गोजिरवाणी" ।

अशा शब्दकळा आणि प्रतिमांचे हे महानोरांच्या काव्याचे विश्व समृद्ध झाले, ते ओवी, अभंग, गौळणी, लावणी, इत्यादी समृद्ध लोक वारशावरच. लोकगीताच्या संवादातूनच महानोरांचा शब्द आविष्कार फुलतो. मराठीच्या निसर्ग कवितेच्या परंपरेत महानोरांनी उभे केलेले हे 'रान' स्वतंत्र संवेदनेचे अस्सल दालन ठरते.

"महानोरांच्या कवितेचे नाते प्राधान्याने संतवाङ्मयाशी, त्यातही वारकरी परंपरेशी जुळलेले आहे. वारकरी संप्रदाय हा सर्वसमावेशक असा फार मोठा सांस्कृतिक प्रवाह आहे." ५ याच सांस्कृतिक परंपरेवर आजची आपली मराठी कविता परिपुष्ट झाली आहे. आणि याच परंपरेला ना. धों. महानोरांनी माणसा-माणसाला जोडलेले ठेवून सर्वव्यापी करण्याचा प्रयत्न केला.

Scanned with CamScanner

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

सारांश :

मराठवाड्याच्या राना, मातीतून उतरलेला हाच साधेपणा, सहजता माणसा-माणसांत भिनली आहे. इथं जे जे काही सकारात्मक घडलेले आहे, त्याच्या मुळाशी समृद्ध असणारी लोकपरंपरा हीच होती. जी जी वैचारिक आवर्तने मराठवाड्याने दिली, ती स्थिरावली आणि विस्तारली देखील. म्हणून मराठी कवितेच्या क्षेत्रातील मराठवाड्याचे आद्यत्व नाकारता येत नाही. लोकधारणा आणि लोकजीवनाला समांतर असण्याची ही परंपरा महानोरांचा काव्य श्वास आहे. आणि याच भूमिकेतून प्राचीन भक्ती आणि शक्ती च्या जोरावर लोकतत्वाला महानोरांनी काव्यरूपाने फुलविले आणि प्रवाही सुध्दा केले.

संदर्भ :

१) दै. लोकसत्ता, लोकरंग (पुरवणी) दि. २६ फेब्रुवारी २०१७

२) राजाध्यक्ष म. वि., रानातल्या कविता, प्रस्तावना, पृष्ठ क्र. ७०

३) महानोर ना. धों., गाथा शिवरायांची, पृष्ठ क्र. १७

४) महानोर ना. धों., पानझड, पृष्ठ क्र. २७

५) डॉ. रेषा., ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे, अनुबंध प्रकाशन, पृष्ठ क्र. २३८

Scanned with CamScanner